मेहकर लोणार मतदार संघात पक्ष संघटन मजबूत करणार : आमदार सिद्धार्थ खरात >> पान 2

किरीट सोमय्या यांची उद्धव ठाकरे यांच्यावर धुळ्यात टीका >> पान 3

केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी आसाममधील मंगलदाई गावाला भेट देऊन शेतकरी, विद्यार्थी आणि ग्रामस्थांसोबत केली चर्चा ! >> पान 4

**सुविचार**

प्रामाणिकपणानेच जीवनात यश मिळते.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 125 ■ सोमवार, दि. 16 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



'देवमाणूस' फेम अभिनेता किरण गायकवाड अडकला विवाहबंधनात

आतील पान

# महायुती सरकारचा नागपुरात मंत्रिमंडळ विस्तार, एकूण ३३ कॅबिनेट मंत्र्यांनी तर ६ राज्यमंत्र्यांनी घेतली शपथ

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी : देवेंद्र फडणवीस ३.० मंत्रिमंडळात एकूण २५ नवनिर्वाचितांना कॅबिनेट मंत्रिपद देण्यात आले आहे. यामुळे आता महायुतीच्या देवेंद्र फडणवीस ३.० मंत्रिमंडळात भाकरी फिरवली असे म्हणता येईल. कारण आता महायुतीतील एकूण २५ नवनिर्वाचित आमदारांना कॅबिनेट मंत्रिपद देण्यात आले आहे.**



**एकूण २५ नवनिर्वाचित आमदारांना कॅबिनेट मंत्रिपद**

एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना जे मंत्री होते आता त्यांच्याहून वेगळी नावे देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडलात आली आहेत. एकूण २५ नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. ज्यात चंद्रशेखर बावनकुळे यांचा समावेश आहे. पंकजा मुंडे, गणेश नाईक, जयकुमार रावल, आशीष शेलार, दत्तात्रेय भरणे, शिवेंद्रराजे भोसले, संजय शिरसाट, प्रताप सरनाईक, भरत गोगवले, मकरंद पाटील, नितेश राणे, अशोक उइकेमाणिकराव कोकाटे, जयकुमार गोरे, नरहरी झिरवाळ, आशीष जैस्वाल, पंकज भोयर, मेघना बोर्डिकर, इंद्रनील नाइक, संजय सावकारे, आकाश फुंडकर, बाबासाहेब पाटील, प्रकाश आबिटकर, माधुरी मिसाळ या नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रिमंडळाच्या एकूण फॉर्म्युल्यावर भाष्य केले आहे. ते म्हणाले की, महायुतीतील एकूण मंत्र्यांना संधी देण्यात येणार आहे. त्यासाठी अडीच वर्षांचा मंत्रिपदाचा कालावधी असणार आहे. यामुळे महायुतीतील एकूण आमदारांना मंत्रिपदाचा लाभ मिळणार आहे.

# येत्या दोन दिवसांत खातेवाटप पुर्ण करू : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** :हिवाळी अधिवेशनातून महाराष्ट्राच्या जनतेला उब आणि ऊर्जा मिळेल असा कारभार करण्याचा प्रयत्न आम्ही करू. राज्य मंत्रिमंडळ विस्तारात आमच्या ३९ मंत्र्यांनी शपथ घेतली असून त्यात ६ राज्यमंत्री आहेत. आजपासून आम्ही आमचा गतिशील कारभार सुरु केलेला आहे. येत्या दोन दिवसांत खातेवाटप आम्ही पुर्ण करणार आहोत, अशी घोषणा मुख्यमंत्री (उच् ) देवेंद्र फडणवीसांनी केली आहे. रविवार, १५ डिसेंबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ विस्तारानंतर महायुती सरकारची मंत्रिमंडळ बैठक पार पडली. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या अधिवेशनात राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा, पुरवणी मागण्यांवरील चर्चा, सत्तारुढ पक्ष आणि विरोधी पक्षांच्या प्रस्तावावरील चर्चा आणि त्यासोबतच जवळपास २० विधेयके अधिवेशनात येणार आहेत. मागच्या काळात निवडणुकीपूर्वी निघालेले अध्यादेश यावेळी विधेयकांमध्ये कन्वर्ट होणार असून चांगले कामकाज करण्याचा आमचा प्रयत्न आहे. विरोधी पक्षांनी मागच्याच अधिवेशनातील पत्रात एक ईव्हीएमचा पॅराग्राफ टाकून आम्हाला ते दिले आहे. त्यांनी पत्रामध्ये जे मुद्दे उपस्थित केलेत त्याची उत्तरे वारंवार आम्ही दिली आहेत. तसेच विरोधक जितके वेळा ते मुद्दे उपस्थित करतील तितक्या वेळा आम्ही निश्र्चितपणे त्याची उत्तरे देऊ. महाराष्ट्रात एक गतिशील सरकार आणण्याचा आमचा प्रयत्न आहे.

विरोधकांकडून ईव्हीएम संदर्भात फेक नरेटिव्ह!



विरोधक ईव्हीएम संदर्भात एक नरेटिव्ह तयार करण्याचा प्रयत्न करत आहेत. पण त्याचेदेखील उत्तर आम्ही चर्चेदरम्यान देऊ. 'ऍींशिू ींश षी चरहरीरिहींीर' असा या ईव्हीएमचा अर्थ आहे. महाष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीने महाराष्ट्राकरिता मतदान केले आहे. त्यामुळे आमचे सरकार हे ईव्हीएमचे सरकार असून त्या ईव्हीएमचा अर्थ Every vote for magnetic Maharashtra असा आहे. तो महाराष्ट्र घडवण्याकरिता आम्ही पुढचा कारभार करू, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

ते पुढे म्हणाले की, सोयाबिन खरेदीमध्ये यावर्षी आपण गेल्या १५ वर्षांचे रेकॉर्ड तोडले आहेत. मागच्या वर्षी सोयाबिन आणि कापसाकरिता भावांतर योजना राबवून शेतकऱ्यांना पैसे दिले. दुध उत्पादक शेतकऱ्यांनाही मदत केली आणि सर्व शेतकऱ्यांच्या पाठीशी ताकदीने उभे राहिलो. परभणीच्या घटनेत एका मनोरुग्णाने ज्याप्रकारे भारताच्या संविधानाचा अपमान केला त्याला अटक करण्यात आली आहे. दुर्दैवाने त्यानंतर एक उद्रेकदेखील झाला. पण अशा प्रकारे एखाद्या मनोरुग्णाच्या कृत्यावर असंवैधानिक पद्धतीने उद्रेक करणे योग्य नाही. हे बाबासाहेबांनादेखील कधीच मंजूर झाले नसते. हे सरकार संविधानाचा सर्वोच्च सन्मान करणारे सरकार आहे. कुठल्याही परिस्थितीत संविधानापेक्षा वेगळे काम हे सरकार करणार नाही. आम्ही सर्वांनी ज्या संविधानाची शपथ घेतली त्या शपथेप्रमाणेच हे सरकार काम करेल.

बीड जिल्ह्यातील सरपंचाच्या हत्येची घटना अतिशय निर्घृण आहे. आरोपी कोणीही असला तरी त्याला सोडले जाणार नाही. या घटना गांभीर्याने घेतल्या जाईल. विरोधकांनी तीन-चार विषय उपस्थित केले असून सभागृहात त्याचे सविस्तर उत्तर आम्ही देऊ. विरोधकांनी सगळी चर्चा करावी. आम्ही त्यांचा आवाज दाबणार नाही आणि चर्चेपासून मागे हटणार नाही. आमची सगळ्या प्रकारच्या चर्चेची तयारी आहे. फक्त लोकसभेप्रमाणे चर्चा न करता पळ काढायचा आणि माध्यमांसमोर बोलायचे, हे योग्य नाही. हे लोकशाहीविरोधी आहे. सभागृहात बोलून माध्यमांमध्ये कव्हर झाले तर ती खरी लोकशाही आहे. पण सभागृहात न बोलता माध्यमांसमोर बोलण्याची लोकशाही जर विरोधक चालवणार असतील तर त्यांचा लोकशाहीवर विश्र्वास नाही, असे म्हणावे लागेल. महाराष्ट्रातील सामान्य माणसाला आणि विदर्भातील जनतेला जास्तीत जास्त दिलासा देण्याचा प्रयत्न आम्ही करू. विरोधकांनी सभागृहात चांगल्या प्रकारची चर्चा करावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच विरोधी पक्षनेत्याबाबत विधानसभा अध्यक्षांनी घेतलेला निर्णय आम्हाला मान्य असेल. खातेवाटपाबाबत आमचे एकमत झाले असून पालकमंत्रीपदाबाबत अद्याप चर्चा झालेली नाही. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी बसून आम्ही पालक मंत्रीपदाचा निर्णय घेणार आहोत, असेही त्यांनी सांगितले.

## एकनाथ शिंदेंची मोठी खेळी; मंत्रिमंडळात सहा नव्या चेहऱ्यांना संधी, अब्दुल सत्तार, तानाजी सावंत, दीपक केसरकरांना डच्चू

**मुंबई/प्रतिनिधी** : महायुती सरकारमधील नव्या मंत्र्यांचा शपथविधी सोहळा आज दुपारी पार पडणार असून ३९ मंत्री शपथ घेणार आहेत. भाजपच्या वाट्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह २० मंत्रिपदे आली आहेत. शिवसेनेच्या वाटाला एकनाथ शिंदेंसह १२ मंत्रिपदे मिळणार आहे. शिवसेनेचे ११ मंत्री आज शपथ घेणार आहेत. तर राष्ट्रवादीला अजित पवारांसह १० खाती मिळणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे ९ मंत्री आज शपथ घेतील. शिवसेनेच्या वाट्याला १२ मंत्रिपदे आली असून आज सकाळपासून नेत्यांना फोन करण्यात आले आहे. मात्र, शिंदे गटातील तीन माजी मंत्र्यांना डच्चू मिळाला आहे. तर चार नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे.

भाजप, शिवसेना (एकनाथ शिंदे गट), राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांच्याकडून मंत्रिपदासाठीच्या आमदारांची यादी फिक्स झाली आहे. आपापल्या पक्षाकडून संभाव्य मंत्र्यांना फोन केले जात आहेत. शिंदे गटाची संभाव्य मंत्र्यांची नावे आता समोर आली असून माजी मंत्री तानाजी सावंत, दीपक केसरकर आणि अब्दुल सत्तार यांना डच्चू देण्यात आला आहे. तर शिंदे गटातून सहा नव्या चेहऱ्यांना मंत्रिपदाची संधी देण्यात आली आहे.

## एकनाथ शिंदेंनी दिलेला शब्द पूर्ण केला; प्रकाश आबिटकरांना प्रथमच मंत्रिपदांची संधी, राधानगरीला प्रथमच बहुमान! राष्ट्रवादीकडून हसन मुश्रीफ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित असा महायुती सरकारचा शपथविधी सोहळा आज (१५ डिसेंबर) पार पडत आहे. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री यांचा शपथविधी पार पडल्यानंतर मंत्र्यांचा शपथविधी आणि विस्तार कधी होणार याची उत्सुकता लागून राहिली होती. अखेर आज नागपूरमध्ये मंत्रिमंडळ विस्तार होत असून यामध्ये शिवसेनेला ११ जणांना आतापर्यत मंत्रिपदासाठी फोन गेले आहेत. यामध्ये उदय सामंत, शंभूराज देसाई, दादा भूसे, गुलाबराव पाटील या मंत्र्यांना पुन्हा एकदा संधी देण्यात आली आहे. नवीन चेहऱ्यांम ध्ये योगेश कदम, आशिष जयस्वाल, भरत गोगावले, संजय शिरसाठ, प्रकाश आबिटकर यांना नव्याने संधी देण्यात आली आह. शिंदे यांच्या वाट्याला १२ मंत्रीपदे येण्याची शक्यता आहे.



कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दोन मंत्रीपद निश्चित

दरम्यान, कोल्हापूर जिल्ह्यात दोन मंत्रीपद निश्चित झाली आहेत. प्रकाश आबिटकरांना प्रथमच मंत्रीपदाची संधी मिळाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून हसन मुश्रीफ मंत्रीपदाची शपथ घेतील. हसन मुश्रीफ यांनी कागल विधानसभा मतदारसंघातून आम दारकीच षटकार मारला आहे. प्रकाश आबिटकर यांनी राधानगरी विधानसभा मतदारसंघातून हॅट्रिक केली आहे.

एकनाथ शिंदे यांनी दिलेला शब्द राखला

राधानगरीमधून आमदारकीची हॅट्रिक केलेल्या प्रकाश आबिटकर यांना निवडणुकीच्या प्रचारामध्ये राधानगरी विधानसभा मतदारसंघांमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना पुन्हा एकदा निवडून दिल्यास त्यांना मंत्रीपदाचा बॅकलॉग भरुन काढला जाईल, असा शब्द दिला होता. शिंदे यांनी मंत्रीपदाचा दिलेला शब्द पूर्ण केला आहे. दरम्यान, राधानगरी विधानसभा मतदारसंघ आजपर्यत मंत्रीपदासाठी उपेक्षितच राहिला आहे. त्यामुळे आबिटकर यांना मंत्रीपदासाठी संधी दिली जावी अशी मागणी मतदारसंघासह जिल्ह्यातून सुद्धा होत होती. प्रकाश आबिटकर यांनी गेल्या अडीच वर्षामध्ये राधानगरीमध्ये केलेला विकासकामांचा डोंगर हा त्यांची जमेची बाजू होती. त्यामुळे त्यांनी राधानगरी मतदारसंघातून ३८ हजार मताधिक्याने विजय खेचून आणत आमदारकीची हॅट्रिक केली. या मतदारसंघातून हॅट्रकि केलेले ते एकमेव आमदार आहेत.

## अखेर हेड-स्मिथची जोडी फोडण्यात भारताला यश, बुमराहने दाखवला पव्हेलियनचा रस्ता

**मुंबई/प्रतिनिधी** : तिसऱ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाचा ट्रेव्हिस हेड आणि स्टीव्ह स्मिथने २०० हून अधिक धावांची पार्टनरशीप केली होती.त्यामुळे एककाळ असं वाटतं होतं की ही जोडी आजचा दिवसभर संपेपर्यत खेळेल. मात्र आता हेड-स्मिथची जोडी फोडण्यात बुमराहला यश आलं आहे. बुमराहने स्टिव्ह स्मिथला आणि ट्रेव्हिस हेडला आऊट केलं आहे. या दोन्ही मोठ्या विकेट बुमराहने घेतल्या आहेत. तिसऱ्या दिवसाची सुरूवात करताना ऑस्ट्रेलियाने २८ धावांची आघाडी मिळाली होती. त्यामुळे इथून पुढे खेळताना टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाचे तीन विकेट घेतले होते. त्यामुळे ऑस्ट्रेलिया बॅकफुटवर गेली होती. मात्र यानंतर मैदानात आलेल्या स्टीव्ह स्मिथ आणि ट्रेव्हिस हेड जोडीने भारतीय गोलंदाजांची तुफान धुलाई केली.दोन्ही खेळाडूंनी शकत मारले होते. त्यामुळे दोन्ही खेळाडुंमध्ये २०० च्या वर पार्टनरशीप झाली होती. त्यामुळे सामन्यात एकवेळ असं वाटतं होत की हे दोन्ही दुसऱ्या दिवसअखेर पर्यत खेळतील. पण रोहितने अनुभवी बुमराहच्या हाती बॉल दिला आणि त्याने स्टीव्ह स्मिथला स्लिपला झेलबाद केले. अशाप्रकार बुमराहने ही जोडी फोडली. त्यानंतर स्टिव्ह जरी पव्हेलियनला गेला असला तरी टीम इंडियाची डोकदुखी वाढवणारा हेड मात्र मैदानातच होता. अखेर बुमराहने त्यालाही पव्हेलियनचा रस्ता दाखवला आहे.

# भाजपा लागला २०२९ च्या तयारीला!

## एकट्याने २००+ जागा जिंकण्यासाठी प्रदेशाध्यक्षपदाची धुरा रविंद्र चव्हाण यांच्या खांद्यावर सोपवण्यात येणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनाआधी आज दुपारी चार वाजता नागपूरमधील राजभवनाम ध्ये नव्या मंत्रिमंडळाचा पहिला शपथविधी पार पडणार आहे. मात्र त्यापूर्वीच भारतीय जनता पार्टीने एक मोठी खेळी केली आहे. विशेष म्हणजे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी यंदाच्या विधानसभा निवडणुकीमध्ये २०२९ साली २०० हून अधिक जागा जिंकण्याचा मानस बोलून दाखवला होता. त्याच भाजपाने ऐन मंत्रिमंडळ विस्ताराच्या तोंडावर घेतलेला हा निर्णय म्हणजे अत्यंत महत्त्वाचं पाऊल मानलं जात आहे. भाजपाने ज्या आमदारांना मंत्रिपदाची शपथ घेण्यास सांगितलं आहे त्यामध्ये चंद्रशेखर बावनकुळेंचाही सम ावेश आहे. मात्र बावनकुळेंकडे मंत्रिपद सोपवण्यात आल्यास त्यांच्याकडील प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी काढून घेण्यात येणार आहे. ही जबाबदारी कोणाच्या खांद्यावर सोपवली जाणार हे सुद्धा भाजपाने निश्चित केलं असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अत्यंत निकटवर्तियावर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

कोणाकडे सोपवण्यात येणार ही जबाबदारी?

अत्यंत विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र भाजपाचे प्रदेशाध्यक्षपद हे डोंबिवलीचे आमदार रविंद्र चव्हाण यांच्याकडे सोपवण्यात येणार आहे. २०२९ साली भाजपाने शतप्रतिशत भाजपा म्हणजेच स्वबळावर सत्तेत येण्याचा चंग बांधला आहे. त्यादृष्टीनेच ही नियुक्ती करण्यात आल्याचं सांगितलं जात आहे. २०२९ म ध्ये एकट्या भाजपाचे २०० हून अधिक आमदार निवडून आणण्याचं उद्दीष्ट समोर ठेवण्यात आलं आहे. त्यामुळेच फडणवीस मुख्यमंत्री असतानाच त्यांचे निकटवर्तीय असलेल्या रविंद्र चव्हाणांवर भाजपा प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली जाणार आहे. रविंद्र चव्हाण हे एक उत्तम संघटक म्हणून पक्षात ओळखले जातात. तसेच फडणवीस यांच्याकडून पडद्यामागे होणाऱ्या अनेक हलचालींमध्ये रविंद्र चव्हाणांचा सक्रीय सहभाग असतो असं सांगितलं जातं.

नव्या प्रदेशाध्यक्षांचा अल्पपरिचय

रविंद्र चव्हाण यांचा जन्म २० सप्टेंबर १९७० साली कल्याण येथे झाला. ते डोंबिवली विधानसभा म तदारसंघातून २००९, २०१४, २०१९ आणि आता २०२४ असे सलग चार टर्म निवडून आले आहेत. रविंद्र चव्हाण यांनी यापूर्वी महाराष्ट्रातील वैद्यकीय शिक्षण, माहिती आणि तंत्रज्ञान, खाद्य आणि नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण आणि बंदरे या खात्यांचे राज्यमंत्रिपदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली आहे. २०२२ साली स्थापन झालेल्या, एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळात ते कॅबिनेट मंत्री राहिले. त्यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम, अन्न आणि नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण ही खाती



देण्यात आली होती. मात्र आता प्रत्यक्ष मंत्रिमंडळात महत्त्वाची जबाबदारी न देता पक्ष संघटना अधिक मजबूतपणे बांधण्याची जबाबदारी रविंद्र चव्हाणांच्या खांद्यावर सोपवण्यात येणार आहे.

# मेहकर लोणार मतदार संघात पक्ष संघटन मजबूत करणार : आमदार सिद्धार्थ खरात

## शिवसेना ( उबाठा) जाफ्राबाद युवासेना शाखेचे हजारो तरुणांच्या उपस्थितीत उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघातील सर्व गावात व वाडी वस्त्यावर युवा सेनेच्या शाखा स्थापन करून ग्रामीण भागात युवा सेनेची मोठी फळी निर्माण करणार. त्याचबरोबर पक्ष संघटन सुद्धा मजबूत करणार. असल्याचे प्रतिपादन मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात हे १२ डिसेंबर २०२४ रोजी लोणार तालुक्यातील जाफ्राबाद येथील युवा सेनेच्या शाखा उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी शाखेचे उद्घाटन आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आशिष दादा रहाटे उपजिल्हाप्रमुख,शिवसेना बुलढाणा हे होते तर मार्गदर्शन नंदू भाऊ कऱ्हाडे (युवासेना जिल्हाप्रमुख,बुलढाणा) प्रमुख अतिथी म्हणून जीवन शेषराव घायाळ (युवासेना तालुकाप्रमुख, लोणार) विजय मोरे सर (संचालक





कृ . उ . बा . स , लो ण ा र ) स्वप्नील हाडे गोपाल खोतकर (युवासेना उपतालुका प्रमुख, लोणार) याचं अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी शाखाप्रमुख शाखाप्रमुख म्हणून स्वप्नील सुरेश ओव्हर, उपशाखा प्रमुख वैभव गणेश ओव्हर, सचिव मदन प्रकाश ओव्हर, सहसचिव प्रदीप शेषराव ओव्हर, कोषाध्यक्ष श्रीराम जानकीराम ओव्हर, सल्लागार किशोर पंढरी ओव्हर, तर सदस्य म्हणून आकाश ओव्हर,विकास वाघमारे,यश ओव्हर,चेतन ओव्हर,हर्षल ओव्हर,प्रभू ओव्हर,आनंद वाघमारे,कुणाल इंगळे,विकास ओव्हर इत्यादींची निवड करण्यात आली. यावेळी युवा सनेच्या शाखेच्या नुतन पदाधिकारी यांचा आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पंचक्रोषीतील तरूणांची मोठी उपस्थिती होती.

युवासेनेला लोणार तालुक्यात दिले जीवन घायाळ मोठे योगदान

शिवसेना पक्ष फुटी नंतर लोणार तालुक्यात युवा सेनेची काही दुरावस्था निर्माण झाली होती परंतु उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेने सोबत एकनिष्ठ राहत युवा सेनेचे लोणार तालुका प्रमुख जीवन घायाळ यांनी सातत्याने मागील दोन वर्षापासून पक्ष संघटन उभे करण्यासाठी प्रयत्न केले त्याचबरोबर झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत पक्षाच्या प्रचार प्रसार चांगल्या प्रकारे करत आघाडी घेऊन प्रचंड मताधिक्य आमदार सिद्धार्थ खरात यांना मिळून देण्यासाठी त्यांचा सिंहाचा वाटा राहिला. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत युवा सेनेच्या माध्यमातून पक्षाची ताकद येणाऱ्या काळात दिसून येणार आहे असल्याचे ते बोलतात. पडत्या काळात जीवन घायाळ यांनी लोणार तालुक्यात युवा सेनेचा केलेला प्रचार प्रसार म्हणजेच संघटन बांधणीसाठी दिलेले मोठे योगदान आहे.

## 'लक्ष्या' मराठी चित्रपट सृष्टीला पडलेले विनोदी स्वप्न

जवळपास दोन अडीच दशके मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा लक्ष्या अर्थात लक्ष्मीकांत बेर्डे याचा आज स्मृतिदिन. लक्ष्या म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीला पडलेले एक विनोदी स्वप्न. लक्ष्या या नावाशिवाय मराठी चित्रपटाचा इतिहास लिहिलाच जाऊ शकत नाही. लक्ष्मीकांत बेर्डे या त्याच्या पडद्यावरील नावापेक्षा लक्ष्या या नावानेच तो अधिक ओळखला जातो कारण हे नाव त्याला प्रेक्षकांनी दिले आहे. लक्ष्या हा मराठी प्रेक्षकांना आपल्यातीलच एक वाटायचा म्हणूनच दहा वर्षाच्या मुलापासून ऐंशी वर्षांच्या आजोबांपर्यंत सर्वांनी लक्ष्यावर अतोनात प्रेम केले. जवळपास दोन अडीच दशके आपल्या सहज – सुंदर, विनोदी अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या लक्ष्याचा जन्म २६ ऑक्टोबर १९५४ रोजी झाला. लहानपणापासून अभिनयाची आवड असलेल्या लक्ष्याने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात टुरटुर या नाटकाद्वारे केला. टुरटुर हे त्याचे पहिलेच नाटक कमालीचे हिट झाले आणि या नाटकातील त्याची भूमिकाही प्रेक्षकांना आवडली. त्यानंतर शांतेचं कार्ट चालू आहे, बिघडले स्वर्गाचे दार या नाटकातून त्याने केलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना भावल्या. ही नाटके देखील हिट झाली. लागोपाठच्या नाटकात विनोदी भूमिका करून लक्ष्या नाट्य सृष्टीत आघाडीचा विनोदी अभिनेता म्हणून पुढे येऊ लागला. याच भूमिकांच्या जोरावर त्याला मराठी चित्रपटातही संधी मिळाल्या. अर्थात नाटका प्रमाणे इथेही त्याला विनोदी भूमिकाच मिळाल्या त्यानेही या भूमिकांचे सोने करत त्याला मिळालेल्या विनोदी भूमिकांना न्याय दिला . त्याच्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना खूप आवडल्या. त्याची लोकप्रियता वाढू लागली. लक्ष्या या नावाने आबालवृद्धांमध्ये त्याची लोकप्रियता पसरली. त्याचे चित्रपट प्रचंड यशस्वी झाले. त्याची जोडी जमली ती महेश कोठारे यांच्यासोबत. महेश कोठारेंचा चित्रपट आणि लक्ष्या नाही असे सहसा घडलेच नाही. कारण महेश कोठारे आणि लक्ष्या ही जोडी म्हणजे यशाची खात्री अशी ओळखच बनली. या दोघांचा चित्रपट म्हणजे मनोरंजनाची शंभर टक्के हमी. या दोघांनी एकत्रित भूमिका केलेले धूमधडाका, धडाकेबाज, थरथराट, झपाटलेला असे कितीतरी चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी झाले. यशस्वीच नाही तर या चित्रपटांना प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. लक्ष्याने सचिन पिळगावकर यांच्या सोबत केलेला अशी ही बनवा बनवी हा चित्रपट देखील हिट झाला. लक्ष्या आणि अशोक सराफ या दोघांचीही जोडी जमली. या दोघांनी एकत्रित अनेक चित्रपट केले आणि ते यशस्वीही झाले. ८० आणि ९० च्या दशकात लक्ष्या आणि अशोक सराफ या जोडीने मराठी चित्रपट सृष्टीत अक्षरशः धुमाकूळ घातला. ही जोडी म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीतील राम लक्ष्मणाची जोडी. या दोन्ही कलाकारांचे ट्युनिंग अतिशय चांगले जमले होते. या दोघानी मराठी मनांचे मनोरंजन करीत अनेकांना आयुष्यातील तणाव, दुःख विसरायला लावून आनंदाचे कारंजे फुलविले. मराठीत लोकप्रियतेच्या शिखरावर असताना लक्ष्याला हिंदी चित्रपट सृष्टीतून चांगल्या ऑफर येऊ लागल्या. त्यातील काही ऑफर त्याने स्वीकारल्या. राजश्री प्रॉडक्शन्सच्या मैने प्यार किया या चित्रपटात त्याला सलमान खानच्या मित्राची भूमिका मिळाली ती त्याने छान निभावली. याशिवाय अनेक हिंदी चित्रपटात त्याने भूमिका केल्या मात्र त्याच्या अभिनयाचा कस लागेल अशा भूमिका त्याला हिंदीत मिळाल्या नाहीत त्या त्याला मिळाल्या मराठीतच. पु ल देशपांडे यांनी लिहिलेल्या एक होता विदूषक या जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटात मुख्य भूमिका निभावली ती लक्ष्याने. या चित्रपटात त्याने केलेल्या गंभीर भूमिकेने त्याच्या अभिनय क्षमतेवर शिक्कामोर्तब केले. हा चित्रपट तिकीट बारिवर अपयशी ठरला तरी त्यातील त्याच्या गंभीर भूमिकेने त्याला अनेक पुरस्कार मिळवून दिले. लक्ष्याने विनोदी भूमिका अधिक केल्या आणि त्या यशस्वीही झाल्या म्हणून विनोदी अभिनेता असे त्याचे वर्णन करणे हा त्याच्यावर अन्याय ठरेल. गंभीर भूमिकाही उत्तम प्रकारे करू शकतो हे लक्ष्याने एक होता विदूषक तसेच लेले विरुद्ध लेले आणि सर आले धावून या नाटकातून दाखवून दिले. आयुष्यभर प्रेक्षकांना हसवणारा हा कलाकार १६ डिसेंबर २००४ रोजी प्रेक्षकांना दुःखाच्या सागरात बुडवून काळाच्या पडद्याआड गेला. विनोदाचा अचूक टायमिंग साधणारा, अभिनयाची दैवी देणगी लाभलेल्या सर्वांच्या लाडक्या हरहुन्नरी लक्ष्याला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

## अल्लू अर्जुन अभिनीत 'पुष्पा २'चा जगभरात दबदबा कायम, गाठला 'इतक्या' कोटीचा आकडा

**मुंबई/प्रतिनिधी** : साऊथ अभिनेता अल्लू अर्जुन स्टारर चित्रपट 'पुष्पा २: द रुल' यावर्षी ५ डिसेंबर रोजी रुपेरी पडद्यावर प्रदर्शित झाला. या चित्रपट बॉक्स ऑफिसवर प्रदर्शित होऊन १० दिवस झाले आहेत. 'पुष्पा २' चित्रपट अजूनही चित्रपट धमाकेदार कमाई करत आहे. 'पुष्पा २: द रुल' आपल्या दैनंदिन कलेक्शनसह नवीन विक्रम बॉक्स ऑफिसवर निर्माण करत आहेत. सॅकनिल्कच्या रिपोर्टनुसार, 'पुष्पा २: द रुल'नं बॉक्स ऑफिसवर पहिल्या आठवड्यात ७२५.८ कोटीची कमाई केली होती. दुसऱ्या आठवड्यातही या चित्रपटाचा दबदबा बॉक्स ऑफिसवर कायम आहे. 'पुष्पा २: द रुल' चित्रपटानं रिलीजच्या नवव्या दिवशी ३६.४ कोटी रुपयांची कमाई केली, तर दहाव्या दिवशी या चित्रपटानं ६२.३ कोटी बॉक्स ऑफिसवर छापले आहेत.

'पुष्पा २: द रुल' जगभरातील कलेक्शन : 'पुष्पा २: द रुल' चित्रपटानं देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर ८०० कोटीचा टप्पा पार केला आहे. या चित्रपटाची १० दिवसात एकूण ८२४.५ कोटी रुपयांची कमाई करून नवा विक्रम रचला आहे. 'पुष्पा २: द रुल' या चित्रपटानं 'आरआरआर'च्या बॉक्स ऑफिस कलेक्शनला मागे टाकले आहे. 'पुष्पा २' हा भारतातील तिसरा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला आहे. या चित्रपटाचं पुढील लक्ष 'केजीएफ २' आहे. 'केजीएफ २' चित्रपटाची एकूण कमाई ८५९.७ कोटीची आहे. 'पुष्पा २'चं जगभरातील कलेक्शन ११९० कोटी झालं आहे. आता हा चित्रपट १५०० कोटी कमाई करण्याच्या तयारीत आहे.

'पुष्पा २: द रुल'ची एकूण कमाई

पहिल्या दिवशी १६४.२५ कोटी रु. दुसऱ्या दिवशी ९३.८ कोटी रु. तिसऱ्या दिवशी ११९.२५ कोटी रु. चौथ्या दिवशी १४१.०५ कोटी रु. पाचव्या दिवशी ६४.४५ कोटी रु. सहाव्या दिवशी ५१.५५ कोटी रु. सातव्या दिवशी ४३.३५ कोटी रु. आठव्या दिवशी ३७.९ कोटी रु. एकूण आठवडा – ८६७.४५ नवव्या दिवशी ३६.४ कोटी दहावा दिवस – ६२.३ एकूण कलेक्शन – ८२४.५

## 'देवमाणूस' फेम अभिनेता किरण गायकवाड अडकला विवाहबंधनात

**मुंबई/प्रतिनिधी** : 'देवमाणूस' या मालिकेच्या माध्यमातून घराघरात पोहोचलेला अभिनेता किरण गायकवाड अखेर विवाहबंधनात अडकला आहे.अभिनेता किरण गायकवाडला 'देवमाणूस' या मालिकेमुळे मोठी लोकप्रियता मिळाली. त्यांनतर आता त्याने वैष्णवी कल्याणकरसोबत लग्नगाठ बांधली आहे. मागील काही दिवसांपासून मराठी मालिकाविश्वात किरणच्या लग्नाची जोरदार चर्चा होती. त्यामुळे त्याचे चाहते सुद्धा उत्सुक होते. अखेर आज १४ डिसेंबरच्या दिवशी लग्नबंधनात अडकून किरण–वैष्णवी साताजन्माचे सोबती झाले आहेत. किरण आणि वैष्णवीने काही दिवसांपूर्वी त्यांच्या प्रेमाची कबुली दिली होती. त्यानंतर १४ डिसेंबर रोजी दोघे लग्नबंधनातही अडकले. सध्या त्यांच्या लग्नाचे फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.किरण आणि वैष्णवीच्या लग्नसोहळ्याला त्यांच्या अनेक कलाकार मित्रमंडळींनीही हजेरी लावली होती. वैष्णवीने लग्नासाठी जांभळ्या रंगाची नऊवारी नेसली आहे तर किरणने पांढऱ्या रंगाची शेरवानी परिधान केली आहे.

दोघेही या नव्या पोशाखात फारच सुंदर दिसत होते. मागील काही दिवसांपासून त्यांच्या साखरपुडा, संगीत, मेहंदी आणि हळद समारंभाचेही फोटो समोर आले होते. त्यामुळे चाहत्यांनाही त्यांच्या लग्नाची उत्सुकता होती. अखेर ही जोडी विवाहबंधनात अडकली आहे.

## अल्लू अर्जुनच्या अटकेमुळे राम गोपाल वर्मा आनंदी?

**मुंबई/प्रतिनिधी** : गेल्या काही दिवसात अनेक घडामोडी घडल्या. पुष्पा २ ने जगभरात १००० कोटींचा गल्ला जमवला. त्याचवेळी हैदराबाद पोलिसांनी सुपरस्टार अल्लू अर्जुनला अटक केली. 'पुष्पा २' च्या स्क्रीनिंग दरम्यान हैदराबादच्या संध्या थिएटरमधील चेंगराचेंगरी आणि त्यात एका महिलेचा झालेला मृत्यू या प्रकरणी अल्लू अर्जुनवर कारवाई करण्यात आली. त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. मात्र त्याच दिवशी त्याला जामीनही मंजूर झाला. या सर्व नाट्यपूर्ण घडामोडींनंतर सर्वच स्तरातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया येत आहेत.

या प्रकरणी आता दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांनीही तीव्र शब्दांमध्ये प्रतिक्रिया दिली आहे.

## अतुल सुभाष आत्महत्याप्रकरणात पोलिसांची मोठी कारवाई; पत्नी निकितासह तिघांना अटक

बेंगळुरु: गेल्या काही दिवसांपासून बेंगळुरुच्या अख इंजिनिअर अतुल सुभाषने आत्महत्या प्रकरण चर्चेत आहे. या प्रकरणात पोलिसांनी आता मोठे पाऊल उचलले आहे. अतुल सुभाषच्या पत्नीसह तीन जणांना अटक करण्यात आलं आहे. आरोपी निकिती सिंघानीयाला हरियाणाच्या गुरुग्राममधून अटक करण्यात आली आहे. निकिताव्यतिरिक्त तिची आई निशा सिंघानिया आणि भाऊ अनुराग सिंघानिया यांनाही प्रयागराज येथून अटक करण्यात आली आहे. आरोपींची माहिती मिळवण्यासाठी बेंगळुरु पोलिसांनी उत्तर प्रदेश पोलिसांची मदत घेतली होती.

बेंगळुरुत इंजिनिअर म्हणून काम करणाऱ्या अतुल सुभाषने आत्महत्या करण्याआधी पत्नीवर हिंसाचाराचा आरोप केला होता. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, पत्नी निकिता सिंघानीयाला हरियाणाच्या गुरुग्राममधून आणि तिची आई निशा आणि भाऊ अनुराग यांना आत्महत्येला प्रवृत्त केल्याप्रकरणी उत्तरप्रदेशच्या अलाहबादमधून अटक करण्यात आली आहे. एका अन्य पोलिस अधिकाऱ्याने याबाबत पुष्टी करत म्हटलं आहे की, तिघा आरोपींविरोधात अतुलच्या विरोधातील तक्रार मागे घेण्यासाठी ३ कोटी रुपये आणि मुलाला भेटण्याचा अधिकार देण्यासाठी ३० लाख रुपये मागितल्याचा आरोप आहे.

अतुल सुभाष त्याच्याच घरात सोमवारी मृतावस्थेत आढळला होता. त्यानंतर त्याचा भाऊ विकास कुमारने सुभाषची पत्नी निकिता, तिची आई निशा आणि भाऊ अनुरागविरोधात तक्रार दाखल केली होती. या व्यतिरिक्त ३४ वर्षीय अतुलने २४ पानांची सुसाइड नोट आणि ८१ मिनिटांचा व्हिडिओ पोस्ट केला होता. यात व्हिडिओने म्हटलं होतं की, मी माझी पत्नी आणि तिच्या कुटुंबीयांसाठी पैशांची मशीन झालो आहे. माझ्याकडून पैसे उकळवून माझ्याचविरोधात त्याचा वापर करत आहेत. त्यामुळं मी आता हे मुळापासूनच संपवून टाकतो, असं म्हटलं होतं.

व्हिडिओत अतुलने त्याच्या मानेवर एक बोर्ड लटकवला होता की ज्यावर लिहलं होतं की न्याय मिळायला हवा. त्याने हा देखील आरोप केला होता की, उत्तर प्रदेशच्या एका कौटुंबिक न्यायालयातील न्यायाधीश त्याच्या सासरच्या मंडळीची बाजू घेतात, असं म्हटलं होतं. सुभाष बेंगळुरुमध्ये एका ऑटोमोबाइल फर्मम ध्ये डेप्युटी जनरल मॅनेजर म्हणून कार्यरत होते. त्यांनी २०१९ मध्ये सॉफ्टवेअर प्रोफ ेशनल निकितासोबत लग्न केले होते. मात्र नंतर ते वेगळे झाले होते. अतुल सुभाषवर हत्या, हुंडा, अनैसर्गिक संबंधसह एकूण ९ तक्रारी दाखल आहेत. काही प्रकरणांमध्ये तर त्यांच्या आई–वडिलांनाही आरोपी केले आहे.





DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### केडीएमसीच्या शिक्षण विभाग मुख्याध्यापक पदोन्नती २०२१ प्रक्रियेतील गैरकारभाराविरोधात भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे आमरण उपोषण






दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी** : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील मुख्याध्यापक पदोन्नती २०२१ प्रक्रियेत झालेल्या गैरकारभाराविरोधात भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सचिव कॉ. रमेश गायकवाड यांनी गेले तीन दिवसापासून आमरण उपोषणाला बसले आहेत. माहिती अधिकारात मिळालेल्या माहितीनुसार शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना त्वरित बडतर्फ करण्याची आणि संशयास्पद पदोन्नती रद्द करण्याची मागणी उपोषणकर्त्यांकडून करण्यात आली आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका शिक्षण विभागातील २०२१ च्या मुख्याध्यापक पदोन्नती प्रक्रियेत अनियमितता व गैरव्यवहार झाल्याची महिती माहितीच्या अधिकाराच्या माध्यमातून मुख्याध्यापक पदोन्नती प्रक्रियेमध्ये फेरफार केल्याचे उघड झाले आहे. त्यासह गोपनीय अहवालाबाबत गैरप्रकार समोर आला असून संबंधित नियुक्त झालेले मुख्याध्यापक पदोन्नती रद्द करत शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना त्वरित बडतर्फ करावे यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे (सीपीआय) सचिव कॉ. रमेश गायकवाड सुभाष मैदानमध्ये आमरण उपोषण सुरू केले आहे.

### लाडक्या बहिणींमुळे वाचलो, पण मेहुण्यांनी:, अजित पवारांनी गाजवली सभा; महिलांना दिले महायुतीच्या विजयाचे श्रेय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : उपमुख्यमंत्री अजित पवार नेहमीच त्यांच्या भाषणाच्या खुमासदार शैलीने सभा गाजवत असतात. अशात आजही अजित पवार यांनी बारामतीतील एका कार्यक्रमात बोलताना विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणींनी वाचवले असे म्हटले आणि उपस्थितांमध्ये एकच



हशा पिकला. यावेळी अजित पवार यांनी लोकसभा निवडणूक, विधानसभा, ईव्हीएमवरील आरोप या सर्व विषयांवर भाष्य करत विरोकांना प्रत्युत्तर दिले. तसेच, ईव्हीएम मशीन मध्ये घोळ असल्याचे सांगून विरोधक रडीचा डाव खेळत असल्याचेही अजित पवारांनी म्हटले.

दरम्यान लोकसभा निवडणुकीत महायुतीतून अजित पवार यांच्या पक्षाला लढण्यासाठी अवघ्या चार जागा मिळाल्या होत्या. त्यातील एका जागेवर विजय मिळाला होता. तर विधानसभा निवडणुकीत अजित पवार यांच्या पक्षाने ५१ जागा लढवत ४१ जागांवर विजय मिळवला. दरम्यान महायुतीच्या विधानसभा निवडणुकीतील विजयामागे लाडकी बहीण योजना असल्याचे सत्ताधारी पक्षांतील नेत्यांनी अनेकवेळा म्हटले आहे.

काय म्हणाले अजित पवार?

बारामतीतील कार्यक्रमात विविध विषयांवर बोलताना आपल्या भाषणाच्या शेवटी उपमुख्यमंत्री उपस्थितांचे आभार मानत होते. त्यावेळी कार्याक्रमासाठी उपस्थित असलेल्या महिलांकडे पाहत अजित पवार म्हणाले, ''माझ्या लाडक्या बहिणींनी मला वाचवले यावेळेस. मी खोटे नाही बोलत, लोकसभेचा निकाल लागल्यानंतर विचार करत होतो की, आपले सरकार यायला पाहिजे. नाहीतर बरोबर आलेले ४०-५० आमदार म्हणतील हे घेऊन गेलं आणि आमचं वाटोळं केलं. आम्ही महिलांसाठी चांगल्या चांगल्या योजना आणण्याचा प्रयत्न केला. त्याचे बहिणींनी स्वागत केले. त्यामुळे आमच्या बहिणींनी मेहुण्यांचे पण ऐकले नाही. आत जाऊन जे बटन दाबायचे होते ते दाबले. आमच्या मेहुण्यांनी दुसरीकडेची बटनं दाबली, पण इकडून बटनं जोरात दाबल्यामुळे आम्ही चांगल्या मताधिक्याने निवडून आलो.''

लाडकी बहीण योजनेचा महायुतीला लाभ

सहा महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने ३१ जागा जिंकत जोरदार कामगिरी केली होती. तर, सत्ताधारी महायुतीच्या वाट्याला १७ जागाच आल्या होत्या. त्यानंतर महायुती सरकारने राज्यात महिलांना अर्थिक सहाय्य करणारी लाडकी बहिण योजना सुरू केली होती. दरम्यान या योजनेचा महायुतीला विधानसभा निवडणुकीत मोठा लाभ झाल्याचे पहायला मिळाले. यामध्ये महायुतीने २३० हून अधिक जागा जिंकत प्रचंड मोठा विजय मिळवला होता. इतकेच नव्हे तर सत्ताधारी पक्षांतील अनेक नेत्यांनी लाडकी बहिण योजनेचा त्यांना फायदा झाल्याचे म्हटले आहे.

# किरीट सोमय्या यांची उद्धव ठाकरे यांच्यावर धुळ्यात टीका

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी** : भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी आज धुळे शहरातील भाजपच्या कार्यालयाला धावती भेट दिली यावेळी त्यांनी पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत पक्षाच्या कार्याचा आढावा जाणून घेतला तसेच यावेळी किरीट सोमय्या यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करत मुंबई महापालिकेच्या निवडणुकीनंतर उद्धव ठाकरेंच्या सेनेचे अस्तित्वच राहणार नसल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

आमच्यासमोर महाराष्ट्राचा विकास आणि विस्तार करणे एवढेच ध्येय आहे मंत्रिमंडळाचा विस्तार हे त्या दृष्टीने टाकलेले एक छोटे पाऊल आहे महाराष्ट्रात विकासाच्या दृष्टीने देवेंद्र फडणवीस यांनी आकलन केलेली आहे पुढील तीन वर्षात महाराष्ट्र हे देशातील १ नंबरचे सर्वात विकसित राज्य असेल.

गेल्या पाच वर्षापासून नरेंद्र मोदी असतील देवेंद्र फडणवीस असेल किंवा मी असेल आणि आमचे कार्यकर्ते असतील आम्ही पुकारलेल्या धर्मयुद्धाला यश आलेला आहे. एकीकडे लव जिहाद लँड जिहाद आणि आता वोट जिहाद सुरू आहे २०५० पर्यंत मुंबईत फक्त ५४ टक्के हिंदू असतील मी आता या विषयात लक्ष घालणार असून छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रात हे होऊ नये. तसेच एक हे तो सेफ हे याचा हा विजय असल्याची प्रतिक्रिया किरीट सोमय्या यांनी व्यक्त केली आहे.

दादर येथील हनुमान मंदिरात काल झालेल्या प्रकाराबाबत किरीट सोमय्या यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली असून उद्धव ठाकरेंचे गँगस्टर जे करतात त्याला राडा असे म्हणत नाहीत. उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांनाच ही भाषा शोभते. उद्धव ठाकरेंच्या पोराला काय अधिकार आहे ज्यांनी हनुमान चालीसा म्हणणाऱ्यांना जेलमध्ये टाकले. तिथे मी गेलेलो असताना मला मारण्यासाठी गाडी पेटवण्याचा प्रयत्न झाला त्या उद्धव ठाकरेंना आता राम का आठवला आपली संस्कृती आहे, आपली शेवटची वेळ आल्यावर आपल्याला



राम आठवतो त्यांच्या पक्षाची आता शेवटची वेळ आलेली आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीनंतर उद्धव ठाकरेंच्या सेनेचा अस्तित्वच नसेल अशी प्रतिक्रिया किरीट सोमय्या यांनी व्यक्त केली आहे.

## तबल्याचा नाद हरपला! तबलावादक झाकीर हुसेन काळाच्या पडद्याआड

**मुंबई/प्रतिनिधी** : उस्ताद अल्लाह राखा खान यांचे पुत्र झाकीर हुसेन यांचे रविवारी रात्री अमेरिकेत १५ डिसेंबर २०२४ रोजी निधन झाले आहे. तबलापटूझाकीर हुसेन यांचेमोठे नाव होते. झाकीर यांना तीन ग्रॅमी पुरस्काराने गौरवण्यात आले होते. संगीत विश्र्वामध्ये तबला वादनाची एक ओळख आहे. झाकीर हुसेन यांच्यामुळे तबलावादन क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व होते. सॅन फ्रान्सिस्को येथून रविवारी ही धक्कादायक घटना समोर आली आहे.

अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्को येथील एका रूग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले होते. वयाच्या ७३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्र्वास घेतला. त्यांना रक्तदाबाची समस्या निर्माण झाली होती. झाकीर हुसेन यांनी आपले वडील उस्ताद उल्ल रखा खान यांच्याकडून



तबलावादनाचे प्रशिक्षण घेतले होते. यानंतर झाकीर हुसेन यांनी वयाच्या अवघ्या ११ व्यावर्षी अमेरिकेत पहिला कॉन्सर्ट केला होता. एकूण ६२ वर्षे झाकीर हुसेन आणि तबला एक समीकरण झाले होते.

झाकीर हुसेन यांचा जन्म हा ९ मार्च १९५१ रोजी मुंबई येथे झाला होता. झाकीर हुसेन हे वयाच्या अवघ्या तिसऱ्या वर्षी वडिलांकडून पखवाज वाजवायला शिकले होते. त्यांचे शालेय शिक्षण हे सेंट झेवियर्स महाविद्यालयातून झाले होते. त्यानंतर त्यांनी १९७३ साली पहिला लिव्हिंग इन द मटेरियल वर्ल्ड नावाचा त्यांचा पहिला अल्बल लाँच केला. त्यांच्या या अल्बमचे लोकांनी आणि चाहत्यांनी कौतुक केले होते.

त्यांनी तबला वादनाला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेले असून उस्ताद यांना १९९२ मध्ये द प्लॅनेट ड्रम आणि २००९ मध्ये ग्लोबल ड्रम प्रोजेक्टसाठी संगीत जगतातील सर्वात मोठा ग्रॅमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. यानंतर २०२४ नंतर त्यांना तीन वेगवेगळ्या संगीत अल्बमसाठी एकाच वेळी तीन ग्रॅमी पुरस्काराने गौरवले. १९७८ मध्ये त्यांनी कथ्थक नृत्यांगना अँटोनिया मिनिकोलाशी विवाह केला. त्यांना अनिसा कुरेशी आणि इसाबेला कुरेशी या दोन मुली आहेत.

## शिवेंद्रराजे भोसलेंना देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात स्थान, सातारा विधानसभा मतदारसंघाला २५ वर्षानंतर मंत्रिपदाचा मान

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला यश मिळाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वातील सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार आज होत आहे. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून ५ डिसेंबरला तिसऱ्यांदा शपथ घेतली तर अजित पवार आणि एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री म्हणून सरकारमध्ये कार्यरत आहेत. महायुतीला सातारा जिल्ह्यातून दमदार यश मिळालं आहे. सातारा जिल्ह्यातील विधानसभेच्या ८ पैकी ८ जागांवर महायुतीनं विजय मिळवला. यात भाजपचे चार, शिवसेनेचे २ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे २ आमदार निवडून आले. विधानसभा निवडणुकींनतर भाजप नेते शिवेंद्रराजे भोसले यांना मंत्रिपद मिळावं यासाठी खासदार उदयनराजे भोसले यांनी महायुतीच्या नेत्यांच्या भेटीगाठी घेतल्या. आता भाजपकडून मंत्रिपदासाठी शिवेंद्रराजे भोसले यांचं नाव निश्चित झालं आहे. शिवेंद्रराजे भोसले मंत्रिपदाच्या माध्यमातून राजकारणातील नव्या इनिंगला सुरुवात करत आहेत.

शिवेंद्रराजे भोसले सातारा विधानसभा मतदारसंघाचे पाचव्यांदा आमदार म्हणून निवडून आले आहेत. राजकारणात सक्रिय झाल्यानंतर सुरुवातीचे काही दिवस शिवेंद्रराजे यांनी युवक काँग्रेसमध्ये काम केलं. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये ते सक्रिय झाले. २००४ च्या विधानसभा निवडणुकीत ते राष्ट्रवादी काँग्रेसकडून विजयी झाले. त्यानंतर झालेल्या प्रत्येक विधानसभा निवडणुकीत ते विजयी झाले. २००९, २०१४ ला ते राष्ट्रवादी काँग्रेसच्या चिन्हावर निवडून आले. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर काँग्रेस राष्ट्रवादीच्या नेत्यांनी भाजप आणि शिवसेनेत प्रवेश केला त्याप्रमाणं शिवेंद्रराजे भोसले यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारकीचा राजीनामा देत भाजपमध्ये प्रवेश केला.



दोनवेळा भाजपच्या चिन्हावर विजयी

शिवेंद्रराजे भोसले २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपच्या चिन्हावर लढले. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या दीपक पवार यांचा पराभव केला. २०२४ ला पुन्हा एकदा शिवेंद्रराजे भोसले यांनी भाजपच्या चिन्हावर निवडणूक लढवली. यावेळी त्यांनी राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचं मताधिक्य घेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार अमित कदम यांचा पराभव केला.

सातारा तालुक्यातील राजकारणावर वर्चस्व

अभयसिंहराजे भोसले यांचं सातारा तालुक्यातील वर्चस्व होतं. त्याप्रमाणं जनसंपर्क आणि विकासकामांच्या जोरावर शिवेंद्रराजे भोसले यांनी सातारा पंचायत समितीवर वर्चस्व कायम ठेवलं आहे. याशिवाय सातारा मतदारसंघात जावळीतील गावांचा समावेश झाल्यानंतर जावळी पंचायत समिती देखील आपल्या ताब्यात ठेवण्यात त्यांनी यश मिळवलं.

अजिंक्यतारा साखर कारखाना ते सातारा जिल्हा बँकेचे चेअरमन

शिवेंद्रराजे भोसले यांच्या नेतृत्त्वात अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना चांगल्या प्रकारे कार्यरत आहेत. अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्यानं आता जावळी तालुक्यातील प्रतापगड सहकारी साखर कारखाना देखील चालवण्यास घेतला आहे. ते १९९४ पासून अजिंक्यतारा साखर कारखान्यात सुरुवातीची काही वर्ष अध्यक्ष त्यानंतर मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत. सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेत २०१५ मध्ये बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत बिनविरोध अध्यक्षपदी निवड झाली आहे.

सातारा नगरपालिकेमध्ये खासदार उदयनराजे आणि आमदार शिवेंद्रराजे भोसले यांनी मनोमिलनामध्ये दहा वर्ष नगरविकास आघाडीच्या माध्यमातून सत्ता राबवली आहे. कोरेगाव, कराड उत्तर मतदार संघात सातारा तालुक्यातील गावं असल्यानं तिथं देखील शिवेंद्रराजे भोसले यांचा मोठा प्रभाव आहे. शिवेंद्रराजे भोसले यांनी २०२४ मध्ये उदयनराजे यांना निवडून आणण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे.

## अजित पवारांच्या 'या' १० आमदारांच्या गळ्यात मंत्रिपदाची माळ; यादी पाहा

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीमध्ये ६० जागा लढवून ४१ जागा जिंकणाऱ्या अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे कोणते मंत्री महायुतीच्या सरकारमध्ये मंत्री असतील हे निश्चित झालं आहे. अजित पवारांच्या पक्षाने केलेल्या लक्षवेधी कामगिरीने सर्वचजण थक्क झाले आहेत. सहा महिन्यांपूर्वीच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये अजित पवारांच्या पक्षाला कशीबशी एक जागा जिंकता आली होती. स्वत: अजित पवार यांची पत्नी सुनेत्रा पवार या सुद्धा लोकसभा निवडणुकीला बारामतीमध्ये सुप्रिया सुळेंकडून दीड लाखांहून अधिक मतांनी पराभूत झालेल्या. त्यामुळेच विधानसभेलाही लोकसभेची पुनरावृत्ती होणार की अजित पवार आपला करिश्मा दाखवणार याबद्दलची उलट सुलट चर्चा होती.



९ आमदार मंत्रिमंळात शपथ घेणार

मात्र अजित पवारांच्या पक्षाने ४१ जागांवर विजय मिळत चुलते आणि पक्षाचे संस्थापक शरद पवार यांच्या शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला जोरदार धक्का दिला. शरद पवारांच्या पक्षाला केवळ १० जागा जिंकता आल्या. त्याच्या अगदी उलट कामगिरी करत शरद पवारांच्या पक्षापैका चौपट अधिक जागा अजित पवारांच्या पक्षाने जिंकल्या. अनेकजागी अजित पवारांच्या उमेदवारांनी प्रथापितांनाही धक्का दिला. शरद पवारांनी प्रचारात जोर लावूनही अजित पवारांचे अनेक उमेदवार सहज विजयी झाले. त्यामुळेच महाराष्ट्रातील राजकीय पटलावर अजित पवारांचं वजन अधिक वाढलं असून दिल्लीशी असणारी जवळीकही वाढली आहे.

अजित पवारांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरेंनी आज म्हणजेच १५ डिसेंबर रोजी पक्षाचे ९ आमदार शपथ घेतील असं प्रसारमाध्यमांना सांगितलं आहे. अजित पवारांसहीत एकूण ९ आमदार असा १० मंत्रिपदांचा वाटा राष्ट्रवादीला मिळाला आहे. मात्र या १० नावांपैकी २ नावांवर शेवटच्या क्षणापर्यंत सस्पेन्स कायम आहे.

१० मंत्रिपदं मिळणार

त्यामुळेच ४१ आमदार निवडून आलेले असताना अजित पवारांच्या पक्षाला फडणवीसांच्या ३.० सरकारमध्ये १० मंत्रिपदं मिळणार आहे. या मंत्रिपदावर कोणकोणाची वर्णी लागली आहे हे मंत्रिमंडळ विस्तारापूर्वी समोर आलं आहे. स्वत: अजित पवारांसहीत अन्य कोणते १० आमदार फडणवीसांच्या मंत्रिमंडळात असतील पाहूयात...

राष्ट्रवादीच्या मंत्र्यांची संपूर्ण यादी :

अजित पवार (उपमुख्यमंत्री)
आदिती तटकरे
नरहरी झिरवाळ
दत्ता भरणे
हसन मुश्रीफ
बाबासाहेब पाटील
मकरंद पाटील
इंद्रनील नाईक
अन्य दोन नावं कोण?

शपथविधीला चार तासांहून कमी कालावधी शिल्लक असतानाही १० पैकी अन्य दोन नावं कोण याबद्दलचं गूढ कायम असतानाच शेवटची दोन नावं ही छगन भुजबळ आणि धनंजय मुंडेंची असतील असं सांगितलं जात होतं. अगदी शेवटच्या क्षणी या नावांची घोषणा होण्याची शक्यता आहे.

# परभणी येथील भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांचे न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाल्याच्या निषेधार्थ मंगळवार ढाणकी बंदचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी** :परभणी येथील संविधान प्रतिकृती विटंबना नंतर समाज बांधवांनी परभणी बंदची हाक दिली होती. दरम्यान काही ठिकाणी दगडफेक आणि जाळपोळ झाली होती पोलिसांनी कोंबिंग ऑपरेशन करत बौद्ध वस्तीत जाऊन आंबेडकरी तरुणांना लक्ष बनवीत अमानुष रित्या बेदम मारहाण केली याचे व्हिडिओ सुद्धा समाज माध्यमावर न्यूज चॅलेंज च्या माध्यमातून सर्वांना पाहायला मिळाले परभणी येथील लॉ कॉलेजमध्ये शिक्षण घेत असलेल्या सोमनाथ व्यंकट सूर्यवंशी या भीम सैनिकास सुद्धा दगडफेकीतील संशयित आरोपी म्हणून पकडून अमानुष मारहाण केली आणि उपचारादरम्यान त्या भीमसैनिकाचा मृत्यू झाला.



या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांचा कोठडीतील मृत्यू हा एक प्रकारे पोलिसांनी केलेला खुनच आहे, संबंधित जवाबदार असलेल्या पोलीस अधिकारी आणि पोलीस कर्मचारी यांच्यावर खुणाचा गुन्हा दाखल करून या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करून दोशींवर कारवाई करावी आंबेडकरी तरुणांवरील जाळपोळ आणि दंगलीचे गुन्हे तात्काळ मागे घ्यावे, मृतकाच्या कुटुंबास ५० लाखाची मदत द्यावी, मृतकाच्या कुटुंवातील एका व्यक्तीस शासकीय नोकरी समाविष्ट करावे, या व इतर मागण्यांसाठी दिनांक १७ डिसेबर मंगळवार रोजी समस्त समाज बांधवांतर्फे ढाणकी बाजारपेठ बंद चे अहवान करण्याचे नमूद केलेले निवेदन बिटरगाव पोलीस स्टेशन ठाणेदार यांना देण्यात आले.

यावेळी निवेदन कर्ते खालील सह्या करणारे संबोधी गायकवाड (अध्यक्ष वंचित बहुजण आघाडी ता उमरखेड), विलास गायकवाड, जअॉन्टी विनकरे, ब्रम्हानंद मुनेश्वर, एजाज पटेल, शेख सलीम शेख हिराजी, कैलास घुगरे, गोलु मुनेश्वर, अनिल गायकवाड, समाधान नरवाडे,गंगाधर पाटील, आलिम कुरेशी,विश्वास धुळे, संतोष गायकवाड, विनोद गायकवाड, करण भरणे, सुधाकर बाभुळकर,रवि सागडे,अतुल वाढवे, अशोक गायकवाड (कोब्रा),प्रकाश कांबळे, अमोल पाटील,संविधान प्रेमी समस्त समाज बांधव ढाणकी व परिसर उपस्थित होते.

# केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी आसाममधील मंगलदाई गावाला भेट देऊन शेतकरी, विद्यार्थी आणि ग्रामस्थांसोबत केली चर्चा !

## आकांशी विकास कामांना गती देण्याची केली सुचना !

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा/प्रतिनिधी** : आकांशी जिल्हा विकास कार्यक्रमांतर्गत १५ डिसेंबरला केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी आसाम राज्यातील मंगलदाई गावाला भेट देऊन तेथील शेतकरी शाळकरी विद्यार्थी आणि ग्रामस्थांसोबत चर्चा करून विकास कामांची माहिती जाणून घेतली सोबतच विकास कामांना गती देण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्यात.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशातील ११२ अविकसीत जिल्ह्याना विकसीत जिल्ह्यांच्या सोबत आणण्यांच्या दृष्टिकोनातून सन २०१८ पासून केंद्र सरकारच्यावतीने आकांशी जिल्हा विकास कार्यक्रम (–उ्झ) योजना देशात सुरु करण्यात आली आहे . केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव हे आसाम राज्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी आज १५ डिसेबर रोजी आकांशी जिल्हयाच्या यादीत असलेल्या दरांग जिल्ह्यातील मंगलदाई गावाला भेट दिली गावातील प्राथमिक शाळा , गावला पाणी पुरवठा करणाऱ्या योजनेची पाहणी केली त्यानंतर शेतकऱ्यांच्या बांधावर जावुन शेती संदर्भात माहिती जाणून घेत शेतकऱ्यांसोबत चर्चा केली . गावातील आयुष्यमान भारत मंदिरालाही भेट देऊन तेथील आरोग्य कर्मचाऱ्यांशी हितगुजन करून आरोग्यसेवा ही ईश्र्वर सेवा मानून रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तींची सेवा करा अशा सूचनाही मंत्री महोदयांनी आरोग्य कर्मचाऱ्यांना दिल्यात . त्यांनतर आसाम येथील कैशल्य विश्र्व विद्यालयाची पाहणी केली आणि जिल्हयातील विभाग प्रमुखांसोबत बैठक घेवून केद्र सरकारच्या वतीने आकांशी जिल्हयासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेचा आढवा घेतला ..या बैठकीदरम्यान केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी विकास कामांना गती देण्याच्या सुचना संबंधीत अधिकाऱ्यांना दिल्यात . यावेळी आमदार बसंत दास आमदार परमानंद राजबोंशी आसाम राज्यातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

---

## विविध वृत्त...

### वझर आघाव जि.प.शाळेने रचला नवा इतिहास




दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप


**बिबी :** नुकत्याच पार पडलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत वझर आघाव तालुका लोणार जिल्हा बुलढाणा येथील जिल्हा परिषद प्राथमिक उच्च प्राथमिक शाळेने प्रथम क्रमांक पटकावला आहे.सर्व वरिष्ठ समित्यांनी लोणार तालुक्यातील सर्व शाळांची तपासणी केली.त्यामध्ये वझर आघाव येथील शाळेचे या स्पर्धे साठी आवश्यक निकष पूर्ण असल्याचा अहवाल सादर त्या अनुषंगाने आज गट शिक्षणाधिकारी श्री जंगलसिंग राठोड सर यांनी वझर आघाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वझर आघाव ला प्रथम क्रमांकाचे तीन लाखाचे बक्षीस जाहीर केले.शाळा सुंदर करण्यासाठी योगदान दिलेल्या सर्व शालेय शिक्षक कर्मचारी शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी ग्रामपंचायत सर्व पदाधिकारी गावातील प्रतिष्ठित नागरिक आणि विशेष म्हणजे ज्यांनी तन मन धनाने शाळेला मदत केली त्यांचे या वेळी गटशिक्षणाधिकारी श्री जंगलसिंग राठोड सर यांनी अभिनंदन केले.यामुळे वझर आघाव येथील नागरिकांसह शालेय विद्यार्थ्यांना अतिशय आनंद झाला आहे

### हिंगोली हादरलं! शेतात बोलवून मित्राच्या मदतीने केला घात, सख्खा भाऊच निघाला वैरी

दैनिक आपला विदर्भ

**हिंगोली/प्रतिनिधी** : हिंगोली जिल्ह्याच्या सेनगाव तालुक्यात रक्ताच्या नात्याला कलंक लावणारी घटना घडली आहे. येथील एका तरुणाने आपल्या सख्खा भावाची हत्या केली आहे. हे प्रकरण एवढ्यावरच थांबलं नाही तर आरोपीनं भावाची हत्या केल्यानंतर, स्वत: पोलीस ठाण्यात जाऊन भाऊ हरवल्याची तक्रार दिली. पण त्याचा हा बनाव फार काळ टिकला नाही. पोलिसांनी आरोपीचं बिंग फोडलं आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी भावासह त्याच्या मित्राला अटक केली असून घटनेचा पुढील तपास केला जात आहे.हरिभाऊ किसन खोडके असं आरोपी भावाचं नाव आहे. तर शिवाजी किसन खोडके असं हत्या झालेल्या लहान भावाचं नाव आहे. दोघंही हिंगोली जिल्ह्याच्या सेनगाव तालुक्यातील शेगाव खोडके इथं राहत होते. आरोपी हरिभाऊ खोडके यानं आपल्या वडिलोपार्जित संपत्ती वाटा राहू नये, म्हणून आपल्या लहान भावाला संपवलं आहे. घटनेच्या दिवशी आरोपीनं कामानिमित्त लहान भाऊ शिवाजी याला शेतात बोलावून घेतलं होतं. भाऊ शेतात आल्यानंतर आरोपीनं मित्र पवन आखाडे याच्या मदतीने भावाची गळा दाबून हत्या केली.यानंतर दोन्ही आरोपींनी शिवारातच खड्डा खोदून शिवाजी खोडके याचा मृतदेह पुरला. हे प्रकरण एवढ्यावरच थांबलं नाही, तरहत्येचा संशय आपल्यावर येऊ नये म्हणून आरोपी भावाने गोरेगाव पोलीस ठाण्यात जाऊन लहान भाऊ हरवल्याची तक्रार दिली. पण २३ वर्षांचा मुलगा अशाप्रकारे अचानक गायब झाल्याने नातेवाईकांना शोध आला. त्यांनी शिवाजी याला विविध ठिकाणी शोध घेतला. यावेळी नातेवाईकांना शिवाजीचा मृतदेह शिवारातील एका खड्ड्यात पुरल्याचं आढळून आलं. हा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी आरोपी भाऊ हरिभाऊ खोडके आणि त्याचा मित्र पवन आखाडे याच्याविरोधात हत्येसह विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला. पोलिसांनी दोघांनाही अटक केली आहे. वडिलोपार्जित संपत्तीत वाटा राहू नये म्हणून आरोपीनं ही हत्या केल्याचं प्राथमिक तपासात उघड झालं आहे. या घटनेचा अधिक तपास गोरेगाव पोलीस करत आहेत.

---



### "तुम्ही हनुमान आहात...", अमित शाहांच्या कौतुकात हे काय म्हणाला वरुण धवन? गृहमंत्र्यांनाही हसू अनावर

**मुंबई/प्रतिनिधी** : बॉलीवुड अभिनेता वरुण धवन अनेकदा मीडिया कॉन्क्लेव्हमध्ये अनेकदा प्रेक्षकांच्या प्रश्नांची उत्तरे देताना दिसतो, पण यावेळी त्याला पहिल्यांदाच प्रेक्षक बनण्याची संधी मिळाली. वरुण धवनने या संधीचा पुरेपूर फायदा घेत समोरच्या मंचावर उपस्थित देशाचे गृहमंत्री अमित शहा यांना राम आणि रावणातील सर्वात मोठा फरकसंबंधी प्रश्न विचारला. यासोबतच वरुण धवनने त्यांचे भरभरून कौतुकही केले ज्यामुळे स्टेजवर बसलेले गृहमंत्री हसू लागले.

नुकतंच देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी 'अजेंडा आज तक २०२४'च्या मंचावर हजेरी लावली. यावेळी त्यांचे विचार ऐकण्यासाठी तिथे वरुण धवनही उपस्थित होता. गृहमंत्र्यांच्या बोलण्याने मंत्रमुग्ध झालेला वरुण त्यांना प्रश्न विचारण्यापासून स्वत:ला रोखू शकला नाही. अमित शहा यांच्या बोलण्याने प्रभावित होऊन वरुण धवनने त्यांना राम आणि रावणातील सर्वात मोठा फरक काय असा प्रश्न विचारला. अभिनेत्याच्या प्रश्नांना उत्तरे देताना अमित शहा यांनी त्यांना धर्म, अनीती आणि अहंकार याविषयी अनेक गोष्टी सांगितल्या.

राम आणि रावणातील सर्वात मोठा फरक काय?

अमित शहा म्हणाले, ''काही लोकांचा कल धर्मानुसार असतो, ते धर्मानुसार आपली कृती ठरवतात. त्याचबरोबर काही लोक त्यांच्या आवडीनुसार धर्म बदलतात. रामाने आपले जीवन धर्माच्या व्याख्येनुसार जगले. त्याच वेळी रावणाने स्वत:च्या व्याख्येनुसार धर्म बदलण्याचा प्रयत्न केला. हा राम आणि रावणातला सर्वात मोठा फरक होता.''

अमित शहा यांच्या बोलण्याने खूश होऊन वरुण धवनने त्यांना देशाचा हनुमान संबोधले जे रात्रंदिवस निस्वार्थपणे देशाची सेवा करतात. अभिनेता म्हणतो, ''एखादा कलाकार लक्षात ठेवलेल्या ओळीही इतक्या स्पष्टतेने बोलू शकत नाही कारण, जितकं मनापासून तुम्ही लोकांना संबोधित करता. एखादी व्यक्ती अशा गोष्टी तेव्हाच बोलू शकते जेव्हा त्या त्याच्या हृदयातून थेट येतात. माझ्या मते तुम्ही देशाचे हनुमान आहात.''

---

### वाळू माफियांविरुद्ध मंडळ अधिकारी गजानन सुरोशे यांची धडक कार्यवाही

दैनिक आपला विदर्भ



**उमरखेड/प्रतिनिधी** :वाळू माफियांविरुद्ध मंडळ अधिकारी गजानन सुरोशे यांची कामगिरी बघता अवैध वाळू उपसा करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर वचक बसवण्यासाठी मंडळ अधिकारी गजानन सुरोशे यांनी पुन्हा एकदा कंबर कसली असल्याचे दिसत आहे.त्यांनी ११डिसेंबर ला रात्री अवैध वाळू टिपर वर कारवाई करून दोन दिवस झाले नाही की, शनिवार १४ रोजी रात्री १०:२० वा मौजे कंरजी येथे विना परवाना रेतीचे उत्खनन व वाहतुक करनारा वाहन पकडून कार्यवाही करता तहसिल कार्यालय परिसरात लावले.सदर ची कार्यवाही गजानन सुरोशे मंडळअधिकारी,गजानन चव्हाण ,राजेश भंडारे, अक्षय शिंदे,पंजाब सानप सर्व ग्राम महसुल अधिकारी कल्यान सोळंके,वासुदेव जुकोटवार महसुल सेवक श्री कांबळे चालक यांनी केली.

अवैध वाळू उपसा आणि वाहतूकीविरुद्ध कारवाई करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या पथकांची कामगिरी शुन्य असून . फक्त मंडळ अधिकारी गजानन सुरोशे हे वाळू घाटावर अचानक भेटी देऊन अनधीकृत वाळू उपसा करणाऱ्यावर कार्यवाही करत आहे . जनतेतून सूर निघत आहे की,मंडळ अधिकारी गजानन सुरोशे हेच एकमेव आपले कर्तव्य बजावत आहे. ढाणकी परिसरात दिवस रात्र अवैध वाळू उपसा होत असताना ढाणकी सर्कल चे मंडळ अधिकारी कारवाई करताना कधीच दिसत नाही.

